किंमत १० रुपये • पृष्ठे १०४ • मार्च २०१६ • वर्ष ८ वे • अंक ३

# राष्ट्रवादी

स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!



# वाकोदचा वटवृक्ष अनंताच्या प्रवासाला!



कै. भवरलाल जैन यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली



ठिबक सिंचनाच्या माध्यमातून लाखों शेतकऱ्यांच्या आयुष्यात समृद्धीची पहाट फुलविणारे जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री, डॉ. भवरलालजी जैन यांच्यावर २७ फेब्रुवारीला जैन हिल्स येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे २५ फेब्रवारीला निधन झाले होते. शेतकरी व मानवतेसाठी उभे आयुष्य वेचणाऱ्या या द्रष्ट्या व्यक्तिमत्वाला अखेरचा निरोप देताना शेतकऱ्यांना अश्रूंचे बांध आवरता आले नाहीत. ज्या भूमीत त्यांनी आयुष्यभर शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी तंत्रज्ञान विकसित करण्यावर, संशोधनावर भर दिला, त्याच शेतीत उभारण्यात आलेल्या विशेष चौथऱ्यावर त्यांचे ज्येष्ठ सुपूत्र अशोक जैन यांच्यासह अनिल, अजित आणि अतुल या चारही सुपुत्रांनी अग्नि दिला.

यावेळी माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, माजी केंद्रीय कृषिमंत्री शरदराव पवार, राज्याचे कृषीमंत्री एकनाथराव खडसे जलसंपदा मंत्री ना. गिरीश महाजन, सहकार राज्य मंत्री दादासाहेब भुसे, आ. गुलाबराव पाटील, आ. सुरेश भोळे, आ. गुरुमुख जगवाणी, आ. स्मिताताई वाघ, आ. चंद्रकांत सोनवणे, माजी विधानसभा अध्यक्ष दिलीप वळसे पाटील, खा. ईश्वरलाल जैन, ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, डॉ. उज्ज्वल निकम, चित्रपट दिग्दर्शक डॉ.जब्बार पटेल, ज्ञानपीठ विजेते डॉ. भालचंद्र नेमाडे, पद्मश्री ना. धों. महानोर, सेबीचे माजी चेअरमन डी.आर. मेहता, जिल्हाधिकारी सौ. रुबल अग्रवाल, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. जालिंदर सुपेकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अस्तिककुमार पांडेय या मान्यवरांसह परिसरातील शेतकरी आणि जैन इरिगेशनचे सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शनिवार पहाटे त्यांचे पार्थिव जैन इरिगेशनच्या विविध आस्थापनांमध्ये नेण्यात आले. सकाळी ९ ते दु. १२ पर्यंत स्व. भवरलालजी जैन यांचे पार्थिव जैन हिल्सवरील आकाश मैदानावर दर्शनासाठी ठेवण्यात आले होते. ते ज्या कार्यालयात बसून आपले कामकाज करायचे त्या कार्यालयात दुपारी १ वाजता त्यांचे पार्थिव, त्यांच्या आसनाजवळ काहीवेळ ठेवण्यात आले. यावेळी त्यांच्या चारही सुपुत्रांसह सर्व सहकाऱ्यांना आपल्या भावना आवरता आल्या नाहीत. दुपारी दीडच्या सुमारास त्यांच्या नेहमीच्या वाहनाने पार्थिव गौराई निवास स्थानी कुटुंबिय आणि नातेवाईकांच्या दर्शनासाठी ठेवण्यात आले. या वाहनाचे सारथ्य त्यांचे ज्येष्ठ सुपूत्र अशोक जैन करत होते. घरचे विधी झाल्यानंतर दुपारी सव्वादोनच्या सुमारास भवरलालजी जैन यांचे पार्थिव गौराई बंगल्याच्या अंगणात आणले. शासकीय सलामीसह शासनातर्फे त्यांचे पार्थिव तिरंग्यात आवेष्टीत करण्यात आले. त्यानंतर सजवलेल्या बैलगाडीतून अंत्ययात्रेला सुरुवात झाली. त्यांच्या चारही सुपूत्रांनी स्वत: बैलगाडी ओढून आपल्या पित्याच्या कृषीक्षेत्रातील योगदानाला अधोरेखीत केले.

दुपारी अडीचच्या सुमारास अंत्येष्टीस्थळावर भवरलालजी जैन यांचे पार्थिव आणण्यात आले, तेव्हा हजारोंचा समुदायाने उभे राहून त्यांना आदरांजली वाहिली. काही वेळ विसावा आणि धार्मिक विधी पूर्ण केल्यानंतर ठिक सव्वातीनच्या सुमारास शासकीय इतमामात अंत्यसंस्काराला सुरुवात झाली. अंत्येंष्ठी गार्डचे प्रमुख रविंद्र बनतोडे यांच्या नेतृत्वाखालील पोलिस कर्मचाऱ्यांनी जैन यांच्या पार्थिवाला सलामी दिली. त्यानंतर

राष्ट्रगीत होऊन मान्यवरांनी आणि जैन कुटुंबियांनी भवरलालजी जैन यांच्या पार्थिवाला पुष्पचक्र अर्पण केले. पावणेतीनच्या सुमारास देशाच्या या सुपूत्राला शासनातर्फे पोलिसपथकाने तोफांची सलामी दिली. त्यानंतर पार्थिवावरील तिरंगा ध्वज सन्मानपूर्वक जैन यांचे ज्येष्ठ सुपूत्र अशोक जैन यांना हस्तांतरीत करण्यात आला. दुपारी साडेचारच्या सुमारास मंत्रोच्चारात स्वर्गीय भवरलालजी जैन यांच्या पार्थिवाला त्यांचे चारही सुपूत्र अशोक, अनिल, अजित आणि अतुल यांनी अग्नी दिला. त्यानंतर उपस्थित सर्वांनी देशाच्या या कृषीरत्नाला भावपूर्ण वातावरणात श्रद्धांजली वाहिली.

अंत्यसंस्कारापूर्वी स्व. भवरलालजी जैन यांच्या पार्थिवाला सर्वप्रथम माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी पुष्पचक्र वाहिले. त्यानंतर त्यांचे स्नेही आणि देशाचे माजी कृषीमंत्री खा. शरदराव पवार यांनी पुष्पचक्र अर्पण केले. त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या वतीने कृषीमंत्री आणि जळगावचे पालकमंत्री एकनाथराव खडसे यांनी पुष्पचक्र अर्पण केले. त्यानंतर राज्याचे जलसंपदामंत्री गिरीश महाजन, सहकार राज्य मंत्री दादा भुसे यांनी पुष्पचक्र अर्पण केले. जैन कुटुंबियांच्या वतीने संघपती सेवादास दलूभाऊ जैन यांनी पुष्पचक्र अर्पण केले.

## सौ. प्रतिभाताई पाटील (माजी राष्ट्रपती) यांची श्रद्धांजली

आपल्या सगळ्यांवरती हा दुःखद प्रसंग इतक्या लवकर येईल अस वाटल नव्हत. भाऊंची तब्येत बरी नाही, दवाखान्यात ॲडमिट केल आहे, मी अमरावतीला होते मला कळल्यावर मी त्यांना फोन केला आणि भाऊंना म्हटल की भाऊ आतापर्यंत असे पुष्कळ ॲटेक्स् येऊन गेलेत आपण त्याला कधी दाद दिली नाही आणि यावेळीही देऊ नका. तर ते म्हणाले की ताई हा सुद्धा डिस्कॉलर्स होत होता. आणि हा मीसकॉल एकदा खरा ठरेल अस वाटल नाही. अनेक लोक, आपण सगळे, प्रत्येक जन्माला येणाऱ्या व्यक्तीला मृत्यु हा अटळ आहे. परंतु ज्यावेळी चांगल्या सुस्वभावी, सोज्वळ, सामाजिक जाणीव ठेवणारे, जिव्हाळा लावणारे अशा व्यक्ती ज्यावेळी निघून जातात त्यावेळी मनाला दुःख झाल्याशिवाय रहात नाही. आज मी प्रकृती बरी नसताना देखील आले, कारण मी आले नसते तर मला ही सारखी रुखरुख लागली असती की मी भाऊंच शेवटच दर्शन घेऊ शकले नाही. आज खरोखर अतिशय दुःखाचा प्रसंग आहे, भाऊ यांच कर्तृत्व हे अपार एक अतिशय सोज्वळ, संप्रवृत्तीचा शांतिस्वरूप असा कर्मयोगी आपण हरवला आहे. शेतकऱ्यांसाठी कमालीचा जिव्हाळा असणारे भाऊ यांनी उच्चशिक्षण घेतल्यानंतर नोकरी ते करू शकले असते, परंतु त्यांनी मातीशी नात जोडल आणि शेतकऱ्यांना फायदेशीर होईल असा उद्योग त्यांनी सुरु केला. ड्रिप इरिगेशनचा एवढा मोठा उद्योग त्यांनी सुरु केला आणि हजारो शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये सुख आणि समृद्धी आणुन देण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांसाठी त्यांच्या मनात कमालीचा जिव्हाळा होता, तेव्हा त्यांना आपण शेतकरीरत्न होते अस म्हटल तरी काही हरकत नाही. केवळ अनेक लोक हे कसे आले असता, मोठमोठे उद्योगपती आहेत, परंतु समाजाच आपण देण लागतो एवढा जिव्हाळा ठेऊन काम करणारे हे भाऊ हे एक वेगळच व्यक्तीमत्व त्यांच्या रुपाने मी बघितल. मी हे ही बघितल की केवळ उद्योग, शेती किंवा अर्थार्जन यातच त्यांचा पुर्ण इन्टरेस्ट नव्हता तर काही ध्येय, काही तत्व, काही समाजातल्या मान्यता यांना मानणारे असे ते भाऊ होते. तिथे गांधी तीर्थाच ज्यावेळी उद्घाटन करायच होत त्यावेळेला मी त्यांना सांगितल. भाऊंनी कधी गांधीवादी असल्याचा दावा केला नाही, परंतु गांधीजींच्या तत्त्वांवरती, आदर्शांवरती, त्यांच्या विचारांवरती कमालीची श्रद्धा असणारे असे भाऊ, यांनी त्यांच एक भव्य अस स्मारक इथे जळगावला उभारल. हा विचार त्यांच्या मनात आला ही विशेष गोष्ट आहे. पुष्कळ उद्योगपती आहेत पण किती लोकांनी असे गांधी तीर्थ स्थापन केले आहेत मला माहित नाही,



परंतु हे एक आगळ आणि वेगळ अस. अति मनापासून ते प्रत्येक कार्यात, प्रत्येक व्यवहारात आणि त्यांच्या विचारामध्ये सत्यता, प्रेम, जिव्हाळा, सोज्वळपणा, सात्विकपणा, सदाचरण, या सगळ्या गोष्टी आपल्याला दिसून येत होत्या. मी प्रेसिडेंट झाले तेव्हा त्यांना अतोनात आनंद झाला, आमची जळगावची भगिनी प्रेसिडेंट झाली! ते म्हणाले मी आनंद व्यक्त करू शकत नाही. आणि त्यांनी नेहमीच मला बहिणीचा मान दिला, नेहमी आदर केला. प्रत्येक भाऊबीजेला त्यांचा फोन आल्याशिवाय राहत नव्हता. तेव्हा एक अतिशय, आणि त्यांनी सगळ्यांशीच जीव लावला, म्हणून आज आपण बघतो आहे की इतके लोक वेगवेगळ्या क्षेत्रामधले त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी इथे जमलेले आहेत. खुप-खुप भाऊंनी चांगल काम केल. त्यांच्या मुलाबाळांवर, कुटुंबियांवरती संस्कार दिलेत आणि ते संस्कार त्यांना आयुष्यभर उपयोगी पडतील याबद्दल मला शंका नाही. अतिशय सुसंस्कारीक अस कुटुंब, सुशिक्षित, उच्चविद्याविभुषीत परंतु साधी राहणी आणि उच्च विचारसरणी याच अनुसरण जे भाऊंनी करून दाखविल ते फार कमी लोक करून दाखवित असतील अस मला वाटत. भाऊंना मी अतिशय मनापासून पुन्हा एकदा श्रद्धांजली अर्पण करते. आणि अशोक, अनिल, अजित, अतुल, या सगळ्यांना तसेच या छोट्यांना, माझ्याजवळ त्यांचे सांत्वन करायला शब्द नाहीत पण परमेश्वर त्यांना हे दुःख सहन करायची शक्ती देवो अशी मी परमेश्वराकडे प्रार्थना करते आणि माझी श्रद्धांजली भाऊंना अर्पण करते.

जैन इरिगेशन उद्योग समुहाचे संस्थापक अध्यक्ष भवरलाल जैन यांच्या निधनाबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी पाठविलेला हा शोकसंदेश.

# द्रष्टा शेतकरी उद्योजक हरपला



ठिबक व तुषार सिंचनाचे साहित्य, पीव्हीसी पाईप, टिश्युकल्चर केळी आणि कांदा, आंबा, डाळिंब यासारख्या शेतमालावर प्रक्रिया करणारी कारखानदारी उभी करुन आधुनिक भारतीय शेतीक्षेत्रात वेगळ्या प्रकारची क्रांती घडविणारे भवरलाल जैन सदैव लक्षात राहतील.

आधुनिक व हायटेक तंत्रज्ञानाची कास धरुन त्यांनी भारतीय शेतीला नवा आयाम दिला. ठिबक व तुषार सिंचनाचे तंत्रज्ञान परदेशातून आणून ते भारतात लोकप्रिय करावे व त्यासाठीच्या साहित्याची येथे दर्जेदार निर्मिती व्हावी हे स्वप्न कै. आण्णासाहेब शिंदे व डॉ. आप्पासाहेब पवार यांनी पाहिले होते. ते स्वप्न पूर्ण करण्याचा भवरलाल जैन यांनी आयुष्यभर आटोकाट प्रयत्न केला. किंबहुना ते सातत्याने असे म्हणायचे की माझा जन्म हा आण्णासाहेब आणि आप्पासाहेबांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठीच झाला आहे. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाची उत्तम पद्धतीने विक्री होऊन त्याला जास्तीचे दोन पैसे मिळाले पाहिजेत यासाठी कराराची शेती विकसीत करुन भवरलालजींनी अत्यंत धाडसाने परदेशी उद्योगांशी स्पर्धा केली. देश व परदेशात प्रक्रिय कारखानदारी उभी केली आणि जगाच्या बाजारपेठेत 'फार्मफ्रेश' नावाचा स्वतःचा ब्रॅन्ड लोकप्रिय केला. १९६३ मध्ये उपजिल्हाधिकारीपदी निवड झालेल्या भवरलाल जैन यांनी नोकरीचा स्वीकार न करता आईवडिलांनी दिलेल्या ७००० रुपयांच्या भांडवलावरती हातगाडीवरुन रॉकेल विकण्यास प्रारंभ करुन देश व परदेशात २७ कारखाने उभे केले व हजारो लोकांना रोजगार दिला. लाखो शेतकऱ्यांना त्यांच्या कष्टाचा योग्य मोबदला दिला. शेतकऱ्यांच्या विकासासाठी आयुष्यभर ते धडपडत राहिले. जळगावात राहून त्यांनी केलेले हे कार्य महाराष्ट्र व देश कधीही विसरणार नाही.

महात्मा गांधीजींचे अत्यंत उत्तम असे 'गांधीतीर्थ' नावाचे स्मारक उभे करुन त्यांनी गांधी तत्त्वज्ञान व विचारांचा अमूल्य ठेवा पुढच्या पिढ्यांसाठी निर्माण करुन ठेवला. अशा या द्रष्ट्या शेतकरी उद्योजकाच्या निधनाने देशाचे मोठे नुकसान झाले आहे. मी त्यांना भावपूर्ण आदरांजली वाहतो.



# श्री. शरदराव पवार यांची श्रद्धांजली



भाऊंच्याबद्दल आस्था असलेले शोकाकुल बंधु-भगिनींनो, खर म्हटल तर गेल्या अनेक वर्षांपासुन मी अत्यंत जवळून पाहिल आहे की कुठल्या प्रकारच संकट आल तर त्या संकटावर मात करून पुढे कस जाव, त्यातुन मार्ग कसा काढावा, तो मार्ग हासत-खेळत कसा काढावा आणि संकटाच विस्मरण होईल या संदर्भातल वर्तन कस कराव? याचा आदर्श म्हणजे भवरलालजी. हे व्यक्तीमत्व देशावर प्रेम करणार, देशातल्या शेतीवर प्रेम करणार, शिवारामध्ये राबणाऱ्या माणसाच्या हिताचा सतत विचार करणार, दुनियेमध्ये जे काही संशोधन झाल किंवा नवीन घडत आहे त्याला लाभ या देशातल्या बळीराज्याला कसा मिळेल? याची सतत चिंता वाहणार, अशाप्रकारच हे व्यक्तीमत्व होत. पाण्याचा संचय असो, शेतीची उत्पादकता वाढविण्याच्या संबंधीच धोरण असो, त्याच्यावर प्रक्रिया करण्याबद्दलची ही निती असो, आणि शेवटी बळीराजाचा संसार कसा सुधारेल या संबंधीचा विचार असो हे सगळे भवरलालजींचे ध्यास होते. आज ते आपल्यातुन गेलेत पण तरी कामाचा प्रचंड डोंगर आपल्यापुढे उभा ठेवला आहे. नवीन कल्पना, संशोधन हे त्यांनी आपल्या सगळ्यांच्या समोर ठेवल आहे. आपण दुःखी राहीलो, आपण अस्वस्थ राहिलो, आपण अश्रू गाळत असू, तर भवरलालजींना कधी त्याच समाधान मिळणार नाही. कसलही संकट आल तर त्याच्यावर मात करण्यासंबंधीची हिम्मत आपण दाखविली तर भवरलालजींच्या आत्म्याला शांती मिळेल. मी एक महिन्यापुर्वी बहुतेक या ठिकाणी आलो होतो, नेहमी अनेक वेळा येऊन गेलो, ते माझ्याकडे नेहमी येत असतात, कधीही राजकारणाची चर्चा नाही व्यक्तीगत कामाची चर्चा नाही ध्यास भारतवर्ष, जगातल्या शेतीच्या क्षेत्रामधले महासत्ता कशी होईल आणि त्या महासत्तेचा लाभ बळीराज्याला कसा होईल यावर एकच विचार हा त्यांच्या चर्चेतून यायचा.

आज ते गेलेत, १०-१५ दिवसांच्यापुर्वी ज्यावेळी मी त्यांना भेटायला गेलो त्यावेळेस इशारा निराळा होता. मला अस वाटत होत की ते याच्यावर मात करतील. पण सर्वच गोष्टी काही तुमच्या-माझ्या मनासारख्या होत नसतात. शेवटी ईश्वरी शक्तीच्या समोर ईलाज नसतो. कदाचित या चांगल्या द्रुष्ट्या व्यक्तीमत्वाची परमेश्वराला सुद्धा आवश्यकता भासली असेल आणि म्हणुन त्यानी ठरवल असेल ठीक आहे आता खुप वर्ष तुमच्यासाठी दिलं, आता आमच्यासाठी त्यांना सुपुर्त करा आणि आज ते त्यांना घेऊन गेले ते आपल्यामध्ये राहिले नाहीत. मी त्यांचा हितचिंतक, त्यांचा एक मित्र, त्यांच्या कुटुंबियातला सहभागी, म्हणून त्यांना अंतः करणापासून या ठिकाणी श्रद्धांजली वाहतो. त्यांच्या कुटुंबियांना आपल्या सगळ्यांच्या पाठिंब्यानं हा आघात सहन करण्यासंबंधीची शक्ती मिळेल अशा प्रकारची अपेक्षा करतो. हे काही गोष्ट सोप नाही त्यांच्या दृष्टीनं पण जे संस्कार, जे विचार भाऊंनी त्यांच्या कुटुंबियांच्या मनामध्ये ठेवलेत त्यांच अखंड स्मरण कुटुंबिय करतील याच्याबद्दल माझ्या मनामध्ये शंका नाही. आणि ते संस्कार पुन्हा एकदा उभ राहण्यासाठी शक्ती कुटुंबियांना देतील एवढच या ठिकाणी सांगतो. महाराष्ट्र सरकारच्या वतीनं, जनतेच्या वतीने एकनाथभाऊ या ठिकाणी श्रद्धांजली वाहतील असे जाहीर करतो आणि माझे दोन शब्द संपवतो.



n. No. : MH/MR/South-283/2014-16
15th of every month posted on 15th, 16th & 17th of every month at Mumbai Patrika Channel Sorting Office Mumbai 400001. RNI No. : MAHMAR / 2008 / 39849


## रब्बी हंगामातील पिकांच्या अधिक उत्पादनाचा महामंत्र

# जैन सुक्ष्म सिंचन तंत्र!



- कांदा, मका, गहू, हरभरा, ज्वारी, सूर्यफुल, ह्या पिकांकरीता जैन ठिबक.
- कमी पाण्यात, कमी वेळेत, कमी विजेत अधिक क्षेत्र सिंचनाखाली.
- रात्री सुध्दा पिकांना पाणी देता येते.
- पाणी वापरामध्ये ५० ते ६० % बचत होते.
- जमिनीत कायम वाफसा, पिकांना पाण्याचा ताण पडत नाही.
- रासायनिक खतांचा अधिक कार्यक्षम वापर.
- भरघोस उत्पादन व अधिक नफा.
- विक्री नंतरची सेवा व शेतीविषयक समस्यांसंबंधी मार्गदर्शन.

**हवं तेव्हा, हवं तिथं, हवं तितकंच पाणी पुरवणार पिकांना.**




जैन ठिबक®
पाणी थेंबानं, पीक जोमानं!®

फोन: ०२५७-२२५८०११; फॅक्स: ०२५७ - २२५८१११; ई-मेल: jisl@jains.com; वेबसाईट: www.jains.com

कार्यालये: अहमदनगर: ९४२२७७२२४८; अमरावती: ९४०३६९५८५६; अकोला: ९४०३०८०१३२; औरंगाबाद: ९४२२७७४९१२; बुलढाणा: ९४२२२८३४२४; बीड: ९४२२७७६८२७; लातूर: ९४२२७७३३८९; जालना: ९४२२७७५९१२; जळगाव: ९४२२७७४९१८; नंदुरबार: ९४०३७७०६२१; नाशिक: ९४२२७७४९१६; नांदेड: ९४०३०८०१०९; मुंबई - ठाणे: ९८७०९९०७५४; नागपूर: ९४२२२८३४०८; वर्धा: ९४२२७७४९२७; यवतमाळ: ९४२२७७५९०९; पंढरपूर: ९४२२७७३३९०; पुणे: ९४२२२८३४२९; रत्नागिरी: ९४२२२९२१०८; सांगली: ९४०३७७०६००; सातारा: ९४२२७७४१८६; सोलापूर: ९४०३६९५८८६; कोल्हापूर: ९४२२७७२२५२